
मुळांवरची
माती
सांभाळताना
किरण भावसार

# मुळांवरची माती सांभाळताना

## किरण भावसार

कादवा शिवार प्रकाशन



ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

**Mulanvarchi Mati Sambhaltana**
**Kiran Bhavsar**

मुळांवरची माती सांभाळताना
किरण भावसार
सुसंवाद : ८१४९८२९८८४
**प्रथम आवृत्ती**
जून २०११
**हक्क :**
सौ. दीपाली किरण भावसार
'विश्वप्रभा', प्लॉट नंबर १९, सरदवाडीरोड,
संजीवनीनगर, सिन्नर, जि. नाशिक.
पिन : ४२२११३.
**प्रकाशक :**
विजयकुमार मिठे
कादवा शिवार प्रकाशन, नाशिक
पालखेड बंधारा,
तालुका दिंडोरी, नाशिक.
मोबाईल : ९८८१६७०२०४
kadvashivar@gmail.com
**मुखपृष्ठ**
संदीप सुके, वडांगळी.
**अंतर्गत सजावट**
दीपक दंडवते
**मुद्रक**
रिप्लिका प्रिंटर्स, वकिलवाडी, नाशिक.
**मूल्य**
१००/- रुपये

स्वत: अपार कष्ट झेलीत
गरिबीच्या झळा जाणवू न देता
आयुष्यभर पुरेल इतकी संस्कारशिदोरी देणारे
**ती. ताई व नाना**
तसेच माझ्या रोमारोमात
कवितेचं बी रुजवणाऱ्या
**वडांगळीच्या सृजनशील मातीस**
कृतज्ञतापूर्वक...


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# अस्सल माणूसपणाची कविता

**व**डांगळी, सिन्नर येथील किरण भावसार हे आमचे एक जीवलग कविमित्र आहेत. त्यांच्या कवितेविषयी आणि माणूसपणाबद्दल आम्हा सर्वांनाच एक असीम उत्सुकता नि ओढ आहे.

गेली पंधरा-एक वर्षे आम्ही किरणच्या काव्यसंग्रहाची उत्कटतेने वाट पाहिली आहे. इतकी त्यांची कविता आम्हाला प्रिय अशी आहे. कारण किरणची कविता खेड्याभोवती, निसर्गाभोवती आणि मुख्यत्वेकरून माणसांभोवतीच घुटमळते.

**गाव शेतात राबायचं शेतावरती जगायचं**
**काळ्या आईची सेवा करीत पांढरीवरती मरायचं.**

किरणचं हे गावावरचं प्रेम वाचकाला अत्यंत प्रामाणिक वाटतं. 'गाव' ही त्यांची एकच कविता किरणचं अवघं कविपण अधोरेखित करण्यासाठी पुरेशी आहे. या कवितेतून मुळांपासून तुटत जाण्याची असाह्यता किरणने इतक्या व्याकूळपणे मांडली आहे की, ही कविता येथील प्रत्येक खेड्याला कवेत घेते. मातीतून उखडले जाण्याची तडफड अचूकपणे नोंदवते... वाचकाला संपूर्ण अस्वस्थ नि अंतर्मुखही करते.

किरणच्या कवितेला एक चिंतनशील डूब आहे. मुख्यत्वे ती शेती आणि कंपनी कामगारांवर संयतपणे संवाद साधते. 'नव्या क्रांतीचे दूत' या कवितेत कंपनी कामगारांचं पिचलेपण मांडणारी किरणची कविता पहा...

**कोठवर करावेत पाढे पाठ**
**संयम आणि सहनशीलतेचे**
**भवितव्य गहाण ठेऊन**
**कुणाकुणाच्या वाहाव्यात पालख्या**
**खांद्यांची सालपटं निघेपर्यंत.**


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

असं सोलीव सत्य समोर ठेवणारी किरणची कविता ही साध्या, सोप्या, सरळ भाषेतली आहे. ती वाचकाला केवळ अस्वस्थच करत नाही तर ती अंतर्बाह्य ढवळून काढते. विचारशील वगैरे करते.

किरणचं बालपण वडांगळीसारख्या सुंदर गावात गेलं. तिथला रांगडा परिसर, साधी माणसं आणि थोर माणुसकी किरणच्या प्रत्येक कवितेतून नितळपणे येते. ती प्रत्येक अभिव्यक्ती निव्वळ लोभसवाणी आहे. मातीची आस आणि माणसांची नाती अलवारपणे जपणारा किरण एक अंतर्बाह्य कवीच आहे.

किरणची कविता, त्याचं वागणं-बोलणं आणि त्यानुषंगाने उमलून आलेलं त्याचं व्यक्तिमत्त्व, यामुळे किरणने कवितेत खूप मोठा गोतावळा जमवला आहे.

या सर्वांनी त्याच्या कवितेवर विलक्षण प्रेम केलेलं आहे. त्याचा संग्रह येण्यासाठी म्हणून दीर्घ अशी प्रतीक्षाही केलेली आहे. त्यात आमचे आदरणीय सुमंतकाका गुजराथी, कविवर्य खलील मोमीन, कमलाकरआबा देसले, विजयकुमार मिठे, रवींद्र मालुंजकर, गौरवकुमार आठवले, हेमंत पोतदार, नीलेश मालाणी, बाबासाहेब भोरकडे, राजेंद्र सोमवंशी, अरुण घोडेराव अशा सर्वांचीच प्रतीक्षा किरणच्या या संग्रहाने पूर्ण होत आहे. असो. म्हणतात ना, 'देर आये दुरुस्त आये!'

नव्वदच्या दशकातील सर्वच क्षेत्रातील अनिश्चितता, जागतिकीकरण, तुटलेपण इत्यादी किरणने आपल्या कवितेत ताकदीने शब्दबद्ध केलेलं आहे. मानवी मनाचे एकाकीपण किरणला आपल्या कवितेतून प्राधान्याने मांडायचे असते.

किरण स्वत: एक कंपनी कामगार आहे. त्यामुळे त्याला जशी कामगारांची दु:खं जवळून पाहता-अनुभवता आली. तशीच एका अपार संवेदनशीलतेतून त्याने शेतीमातीलाही 'आपलं' मानलेलं आहे. त्या दु:खाचे कढही किरण कवितेतून मांडतो. तेव्हा त्याची ती अभिव्यक्ती ही वरवरची किंवा केवळ लेखनापुरती नसते. ती आतआतून येते.

उमाळ्याने आणि आपलेपणातूनच येते.

त्याच्या सर्वच कविता मुळापासून वाचण्यासारख्या आहेत. मुळं उघडी पडण्याचं त्याला दु:ख आहे. या कविता केवळ पराभूत मानसिकतेच्या नाहीत, कविता खऱ्या अर्थाने उमेद वाढविणाऱ्या, आशादायीही आहेत. लढणाऱ्या माणसांना त्या प्रेरणा नि प्रोत्साहनही देतात. 'बैलांस' या कवितेत किरण लिहितो,

**दोन दिसात पडंल पाऊस**
**तव्हर तग धरून रहा**
**कोरडी डाखळं चघळीत चघळीत**
**नव्या निळ्याची वाट पहा.**

किंवा 'हाडवैरी' या कवितेचा शेवट पहा,

**एकदाचं वाळवंट तरी व्हवून जाऊ दे**
**तिथं तरी एखादी हिरवळ**
**गवसंलच कनी!**

अनुभवांची इतकी व्यामिश्रता किरणच्या कवितेत येते की, ही सगळी कविता वाचताना स्वत: किरणचंच चरित्र आपसूक समोर उभं राहतं. किरणची कविता निव्वळ अभिव्यक्तीसाठी नाही तर त्याची प्रत्येक कविता अंत:करणाला थेट भिडते.

'मुळांवरची माती सांभाळताना' या कवितासंग्रहात त्यांची 'गाव' ही कविता मोरपीस असेल तर 'जगण्याचा चारा' ही कविता देवघरातल्या पणतीसारखी शांतपणे तेवतानाचा सुंदर अनुभव देते. आईवरील किरणच्या कवितेची ही सुरुवात पहा, किती गहिरा आहे...

**तुझ्या मायेचा पदर कधी कळलाच नाही**
**आज पोळल्या दिसांची झळ सोसवेना आई.**

नि याच कवितेचा समारोप किती लोभस आहे पहा...

**मऊ मातीच्या मेण्यात ग्रंथ तुझा झाला पुरा**
**पानापानांच्या कुशीत आम्हा जगण्याचा चारा.**

किरणचं माणूसपण प्रत्येक कवितेतून ठळकपणे जाणवत राहतं. त्याच्या कवितेतला थंडावा आणि प्रसंगी कोलाहलही हा सामाजिक जाणिवेकडेच पोहचतो. त्याच्या कवितेतील हरेक संदर्भ हे प्रत्येकाला आपले वाटतात. त्याच्या कवितेतील प्रतिमा आणि प्रतीकं सामान्य माणसाच्या माहितीतली असतात. म्हणून किरणच्या कवितेचा स्वर अत्यंत सच्चा नि प्रामाणिक वाटतो.

किरणच्या कवितेत चकित करणारं वास्तव आहे. झाड आणि माणूस यांचं आदिम नातं आहे. महत्त्वाचं म्हणजे मनाचा ठाव घेणारं अस्सल माणूसपण आहे. काबाडकष्ट करणाऱ्यांची वेदना आहे. तसा प्रकाशाचा अनुपम सोहळा आहे. उसाचा गोडवा आहे नि अतीव हळवी, ओल्याकिच्च माणुसपणाची अनुभूतीही आहे. ही कविता मनात रेंगाळणारी अशी आहे...

**सण पंचमीचा**
**दूरदेशी प्राण**
**हेलकावे मन**
**झुल्यावर.**

'मुळांवरची माती सांभाळताना' या दीर्घकाळ प्रतीक्षा केलेल्या अलवार, उत्कट, संवेदनशील, सच्च्या कवितेचं मी अत्यंत आनंदाने मन:पूर्वक स्वागत करतो आणि काळजातल्या मित्राचा अक्षरप्रवास चिरंतन सुरू राहो, अशी निर्मिकाकडे प्रार्थना करतो.

**विवेक उगलमुगले (नाशिक)**
**चलभाष : ९४२२९४६१०६**

⌘⌘

# मनातलं...

खरा मी रसिकच! कविता वगैरे लिहिणं नंतरचं. शाळकरी वयात फारसं वाचायला मिळालं नाही, पण वाचनाची भूक तीव्र होती. शाळेच्या वाचनालयात भरपूर पुस्तकं असायची, पण आम्हा विद्यार्थ्यांना ती वाचायला मिळायची नाहीत. मग आवडत्या शिक्षकांना गळ घालून त्यांच्याकडची पुस्तकं आणून वाचन सुरू होतं. अशात मनावर कवितेनं कधी गारुड केलं ते कळलं नाही. काळजाला चटकन भिडण्याच्या कवितेच्या वैशिष्ट्यामुळे तिच्याकडे ओढला गेलो. शाळा-कॉलेजच्या दिवसातच लिहिता झालो. वडांगळीसारख्या शहरापासून दूर असलेल्या खेड्यातच अर्धअधिक आयुष्य गेल्यामुळे स्वत:ची शेती नसली तरीही मनावर-शरीरावर शेतीमातीचेच संस्कार झाले. हातावरचा प्रपंच असताना आईवडिलांनी शिलाई मशीन अहोरात्र चालवून आम्हा भावंडांना गरिबीच्या झळांपासून दूरच ठेवलं. ऐपतीप्रमाणे शिक्षण अन् त्याहूनही कितीतरी उच्च प्रतीचे संस्कार दिले. अशिक्षित आई अन् मॅट्रिकपर्यंत शिकलेले वडील. घरात साहित्याचा वारसा नसतानाही मला लेखनाचा लळा लागला. वडिलांना कथा-कीर्तनाची असलेली आवड अन् त्या काळात रेडिओवरील श्रुतिका, नभोनाट्ये, रूपकं, काव्यवाचन, आपली आवड यांसारखे कार्यक्रम ऐकण्याची आईची आवड यांतून दर्जेदार वाङ्मयाबद्दलची माझी अभिरूची वाढत गेली. पहिली कविता दै. रामभूमीच्या 'बालभूमी'तून प्रसिद्ध झाली अन् पुढे लिहितच गेलो. कल्पनेच्या भराऱ्या कवितेतून मारता आल्या नाहीत. शिकून झटपट नोकरी मिळविण्याच्या हेतूने आयटीआयचे तांत्रिक शिक्षण घेऊन औद्योगिक क्षेत्रातील कामगार विश्वात प्रवेश केला. भोवतालच्या कामगार विश्वात अनेक बऱ्या-वाईट घटना घडत असतानाही, माझ्या 'ॲडव्हान्स्ड् एन्झाईम्स' या कारखान्याने माझ्यातील कलागुणांना सातत्याने प्रोत्साहन


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

देऊन सदैव कौतुकाची थाप पाठीवर दिली. रोजी रोटीबरोबरच काव्यलेखनाला अशारीतीने पाठबळ मिळत गेले. प्रतिवर्षी होणाऱ्या राज्यस्तरीय कामगार साहित्य संमेलनातील कविसंमेलनामध्ये सहभाग, कारखान्याच्या दिशा त्रैमासिकातील लिखाण अशा अनेक संधी कारखान्याने उपलब्ध करून दिल्या. कारखान्याचे संचालक मा. श्री. मुकुंद काबरा व मा. श्री. गोविंद गोरे तथा कवी वैशाख यांच्या पाठबळामुळेच हा कवितासंग्रह रसिकांपुढे आला आहे. आजूबाजूचे वास्तव, शेतकरी व कामगारांच्या जीवनातील सुख-दु:ख यांच्याभोवतीच माझी लेखणी सातत्याने फिरत राहिली. उमेदीची बारा वर्षे पत्रकारितेत घालविण्यामुळे सामाजिक प्रश्नांची जाण होतीच. गावातील जीवलग मित्र प्रकाश खुळे, रवींद्र खुळे यांच्या सहवासातून वडांगळीत 'दिग्विजय परिवार' या संस्थेच्या कामात भाग घेता आला. वाचनालयाचं स्वप्न मूर्त स्वरूपात आलं. नीलेश मालाणी, गोरख चव्हाणके, दीपक खुळे, राजाराम खुळे, अशोक घुमरे, सुधाकर निंबाळकर असे अनेक मित्र लिहिण्याचं बळ देत राहिले. वडांगळीची मातीच सांस्कृतिक कर्तृत्व फुलवणारी असल्याने व गावकऱ्यांच्या, कौडकौतुकाने लिखाणातला माझा आनंद, उत्साह वाढत गेला. आई-वडील म्हणजेच ती. ताई-नानांची प्रेरणा, भाऊ राजू व संदीप यांची साहित्यिक अभिरुची सतत प्रेरक ठरली. पत्नी दीपालीनेही कवितेचं पुस्तक यावं यासाठी आग्रह धरला. प्रसाद आणि ओम या चिमुरड्यांनी माझ्यासोबत कवितेच्या ओळी गुणगुणत कवितेने घर अक्षरश: भरून टाकले. मातृवत प्रेम करणाऱ्या कारखान्याच्या सरव्यवस्थापिका मा. मंगला काबरा, कौतुकाचा वर्षाव करणारे मा. श्री. किशोर राठी, माझे वरिष्ठ मा. श्री. अविनाश अंबुलगेकर, कारखान्याच्या वेल्फेअर सोसायटीचे मा. सतीश पगार, मा. डॉ. अनिलकुमार गुप्ता, मा.श्री. भास्कर मनोलकर, कारखान्यातील मित्र मा. बाबासाहेब भोरकडे, मा. दत्ता पांडे, मा. सूर्यकांत शिंदे, मा. भगवान सानप, मा. काशिनाथ पाटील यांचे प्रोत्साहन माझ्यासाठी सतत आनंददायी राहिले आहे. महाराष्ट्र

कामगार कल्याण मंडळाच्या साहित्यविषयक विविध उपक्रमांमुळे तसेच कामगार साहित्य संमेलनातील सहभागामुळे लिखानातील सामाजिक जाणीव प्रगल्भ होत गेली. मंडळाच्या प्रोत्साहनामुळेच काव्यनिर्मितीतल्या या टप्प्यापर्यंत पोहोचता आले. कवितेच्या या वाटचालीत अनेक कविमित्र भेटले. कवी रवींद्र मालुंजकरांनी सर्वप्रथम कवितेच्या पाऊलवाटेवर आणून उभं केलं. याच वाटचालीत विवेक उगलमुगले, विजयकुमार मिठे, गौरवकुमार आठवले, राजेंद्र सोमवंशी या मित्रांनी सातत्याने पाठराखण केली. पुस्तक प्रकाशित व्हावं हाही या मित्रांचाच हट्ट. दहा वर्षे सातत्याने त्यांनी पुस्तक प्रकाशनासाठी पाठपुरावा केला. सिन्नरचं मंडळ 'साहित्य रसास्वाद', त्यातील कवी अरुण घोडेराव, मधुकर जाधव, चंद्रकांत कानडी, अरविंद किन्हीकर, नाना गुजराथी यांचीही कवितेच्या वाटचालीत संगत-सोबत लाभली. कविवर्य खलील मोमीन यांचे लाभलेले निर्व्याज प्रेम, त्यांचे कवितेवरील भाष्य अन् कविता ऐकत त्यांच्यासोबत घालवलेले तासन् तास कविता लेखनाला वेगळं वळण लावून गेले. दलितमित्र सुमंतकाका गुजराथी यांचे आशीर्वाद अन् पुस्तक प्रकाशित करण्याबाबतची त्यांची तळमळ, त्यासाठी त्यांनी प्रकाशक श्री. विजयकुमार मिठे यांच्याशी परस्पर केलेला पत्रव्यवहार, सतत केलेली विचारणा यासाठी माझ्याकडे कृतज्ञतेचे शब्द नाहीत. हा संग्रह प्रकाशित करणारे 'कादवा शिवार प्रकाशन'चे मा. विजयकुमार मिठे, प्रस्तावनेतून अन् सदोदितच पाठराखण करणारे कविमित्र विवेक उगलमुगले, संग्रहासाठी आशयपूर्ण मुखपृष्ठ चितारणारे चित्रकार संदीप सुके, पुस्तक देखणे होण्यासाठी सुबक मांडणी व आकर्षक अंतर्गत सजावट करणारे श्री. दीपक दंडवते तसेच आजवर कौतुक करून माझ्या लिखाणाला सतत प्रोत्साहन देणारे माझे सर्व स्नेही, मित्रपरिवार व रसिकांचे मन:पूर्वक आभार मानून हा संग्रह आपणापुढे ठेवतो. धन्यवाद!

**किरण भावसार**

# अंतरंग


| | |
|---|---|
| जगण्याचा चारा | १३ |
| गाव | १५ |
| खोडवा | १९ |
| आठव | २१ |
| फेरीवाल्यांनी फिरकूच... | २३ |
| नव्या क्रांतीचे दूत | २६ |
| हाडवैरी | २७ |
| कदाचित | २८ |
| झुल्यावर | ३० |
| आठवांच्या पागोळ्या | ३२ |
| मातीला पारखी होऊन | ३३ |
| बैलांस | ३५ |
| सायकल | ३६ |
| आसरा | ३९ |
| देवराया आता | ४१ |
| पाणकळा | ४३ |
| जगण्याची ओढ | ४४ |
| ऋतू दुष्काळाचा | ४६ |
| आसवे | ४८ |
| चिऊताईचं घरटं | ५० |
| झुळूक (?) | ५२ |
| सीमोल्लंघन | ५३ |
| कोडे | ५४ |

| | |
|---|---|
| सांज | ५६ |
| आसवांचा पाऊस | ५८ |
| जीवनअर्घ्य | ६० |
| मन | ६२ |
| जुगार | ६३ |
| कसे? | ६६ |
| वाट | ६८ |
| पोटशूळ | ७१ |
| सरी | ७३ |
| खरीप टळून गेल्यावर | ७४ |
| दिस रात | ७५ |
| तू आणि मी | ७७ |
| संक्रांत | ७८ |
| मरणकळा | ८० |
| अनावर | ८१ |
| वेडी बाभूळ | ८२ |
| वखवखलेलं रान | ८३ |
| बिटको पॉईंट | ८५ |
| खाणाऱ्यांची मज्जा! | ८८ |
| मायची माती | ९० |
| न्यारी | ९१ |
| शब्दफुलांच्या वाटेवरती | ९२ |
| नव्या उभारीसाठी | ९३ |
| आठवणींची भरता शाळा | ९५ |

# जगण्याचा चारा

तुझ्या मायेचा पदर
कधी कळलाच नाही
आज पोळल्या दिसांची
झळ सोसवेना आई.

दिस कोवळ्या फुलांचे
कसे आले कसे गेले
त्यांच्या आठवांचा गंध
मनातून दरवळे.

माझा पोसला गं पिंड
तुझ्या मायेच्या मातीत
मज येई ना गं नीज
थंड जहरी सुखात.

तुझे कौतुकाचे बोल
चढे मूठ मूठ मांस
इथे भाटांच्या दाटीत
माझा कोंडतो गं श्वास.



ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

बोट संस्काराचे तुझे
मज सोडवेना आई
जगी बेगडी जिण्याची
चाले रोजचीच घाई.

मऊ मातीच्या मेण्यात
ग्रंथ तुझा झाला पुरा
पानापानांच्या कुशीत
आम्हा जगण्याचा चारा.

⌘⌘

# गाव

कितीं बदललं गाव आता
गाव गावात राहिलं नाही
धड खेडंही उरलं नाही
अन् शहरही झालं नाही.

पहाटे लवकर उठायचं गाव
चारा वैरण करायचं
रामपहाऱ्यात देव न्हाणून
मोट नाडा धरायचं.

गोड गळ्यांनी ओव्या गुंफीत
जात्यावरती दळायचं
गायगुरांचा शेणकुर करून
पीठ पायलीचं मळायचं.

सूरपारंब्या, विटीदांटू
आराधरी खेळायचं
लिंगूर्च्या, आबाधोबी
आट्यापाट्यात लोळायचं.



साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

पोरीबाळींच्या फुगड्या लंगड्या
सागरगोट्यांत दमायचं
भुलाबाईच्या खेळामधी
गोड गाणी म्हणायचं.

कथा, कीर्तनं ऐकायचं
पोथ्या पुराणं वाचायचं
भजनं, भारुडं करता करता
हरिपाठात नाचायचं.

पारावरती शिराळगप्पा
कुटाळक्या करायचं
अडल्यानडल्या जीवासाठी
मागं नाही सरायचं.

सवसांजंला गुरांसंगं
घरओढीनं पळायचं
गोठ्यातून हंबरताना
दिवा होऊन जळायचं.


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

गाव शेतात राबायचं
शेतावरती जगायचं
काळ्या आईची सेवा करीत
पांढरीवरती मरायचं.

आता कसलं चारापाणी
दावण झाली सुनी सुनी
एवढ्या रामपहाऱ्यात उठून
शेतात नाही जात कुणी.

गिरणीतलंच पीठ आता
चूल फुकावी लागत नाही
जाते केव्हाच जाते झाले
ओव्या कोणा कळत नाही.

टीव्हीवरती क्रिकेट पाहून
मनातच खेळतात पोरं
गोठ्याच्या जागी घरं वठली
गावात राहिली नाही गुरं.

पोळ्याला आता मातीचेच बैल
खरे बैल उगीच काही
ट्रॅक्टर, जीपच्या जमान्यात
बैल पोसण्यात अर्थ नाही.

नटीसारखं नटूनथटून
पोरी आजकाल मिरवतात
झिम्मा फुगडी खेडवळपणा
अशा झोकात वावरतात.

पार आताही भरलेले
डावात पत्त्यांच्या रंगलेले
ज्याचे त्याचे ज्याला त्याला
सारे स्वत:त दंगलेले.

कथा, कीर्तनांना आताशा
गर्दी तशी कमीच असते
पुराणातली वांगी टीव्हीवर
देवळात सहसा कुणी नसते.

फोन, विजेचे खांब आले
टीव्ही, व्हीडीओ गेम आले
शहर होता होता माझे
गाव कुठे वाहून गेले.

# खोडवा

ऊस अन् माणूस
तसा फारसा फरक नाहीच
इथल्या मातीबरोबर
माणसातही रुजला ऊस
ऐन जवानीतल्या भरदार गड्यावानी
तुऱ्यावरही येतो अन्
आयुष्य संपलं म्हणजे
खोडवाही होतो ऊस.

सुरू-दुरी-तिरी अशा तीन टप्प्यात
बाल्य-युवा व वृद्धावस्थाही
भोगतो तो
त्याला वृद्धाश्रम मात्र नाही
ॲव्हरेज घटणार वाटलं की
फुटू पाहणाऱ्या कोंभांसकट
पेटवलं जातं रान... मोकळं करण्यासाठी
खांडवनासारखं.

असं ठरलेलं अन् ठरवलेलं आयुष्य
गोड करीत
पेटतो खोडवा
आभाळ चाटीत
पण जळतानाही
पसरतो गोडवा
आसमंतात.

⌘⌘

# आठव

तिच्या माहेराला आता
पूर मायेचा येईल
परसात लिंबोणीची
माय सावली होईल

आला घरधनी तिचा
तिला धाडा हो सासरी
पाय अडला दारात
पडे हुंदका बाहेरी

दूर डोंगरात गाव
वाट परकी परकी
पाणी दाटल्या डोळ्यात
माय भुरकी भुरकी

बाप तिचा वाघावानी
चार गावात दरारा
आसू माईना डोळ्यात
अन् फुटला बंधारा

बालपणीच्या गं सयी
नाही बुजल्या खुजल्या
जशी सारवली भूई
मनामनात रुजल्या

अवघडलं अंगण
सया जमता दाराशी
आठवांचा घुमे पिंगा
वाट सरता जराशी

# फेरीवाल्यांनी फिरकूच नये अशा दिवसात

मेटाकुटीने ढकलत आणलेला
महिनाअखेरीचा हरेक दिवस
जेव्हा उरावर बसून उगवू लागतो...
अशा दिवसांत
फेरीवाल्यांनी फिरकूच नये अजिबात
असं वाटतं सारखं.
... ते मात्र हमखासच येतात
संकटांप्रमाणं.

रिकाम्या खिशाला आव्हान देणाऱ्या
त्यांच्या भुलवणाऱ्या आरोळ्या
कितीही कर्कश्य वाटल्या
तरी टाळता येत नाहीत.

इथे काबाडांच्या वस्तीत
हक्काची बाजारपेठ समजून
ते खात्रीने येत असतात
त्यांना प्रवेशही अगदी सहजच मिळतो
आमच्या दारापर्यंत.

‘येथे फेरीवाल्यांना प्रवेश नाही’
अशा पाट्या इथे नाहीत
अन् नाही त्या लटकावण्याची सोयही.

उगीचच साहेब साहेब म्हणत
बायका-पोरांसमोर ते देतात
एकेक फायदेशीर ऑफर
एकावर दोन फ्रीसारख्या...
बायकोला एकवेळ समजावताही येईल
पण मुलांचं काय?

आपला सर्व अनुभव पणाला लावीत
ते अधिकाधिक मोहात पाडीत जातात
अगदी सात तारखेपर्यंत
उधारीलाही ते असतात तयार
त्यांना सांगणार कसं
पगारावर आधीच चढलेल्या बोजांबाबत.

आयुष्यातील अनेक मोह टाळूनसुद्धा
या फेरीवाल्यांना टाळणे जमत नाही
आवश्यकता नि ऐपत नसतानाही
त्यांच्याकडच्या अनेक वस्तू
आमच्या घरात बस्तान मांडून बसलेल्या.

अखेर फेरीवालेच यशस्वी होतात
त्यांच्या आर्जवी व दीनवाण्या चेहऱ्यात
मला माझाच फाटका संसार दिसू लागतो
अन् मी खर्चाचा आणखी एक गोवर्धन
पेलायला राजी होतो.

आपल्या पगाराची नेमकी तारीख तरी
मला माहीत आहे
त्यांच्या लेकराबाळांचं काय...?

⌘⌘

# नव्या क्रांतीचे दूत

बेकारीचं कवच लेऊन पिडलेली
आजची तरुणाई
परजीत आहे हत्यारं
अन्याय, अत्याचारांनी
ओसंडून वाहणाऱ्या
समाज व्यवस्थेविरुद्ध.

हे बनतायेत आधारस्तंभ
पोकळ होत चाललेल्या
इथल्या उद्यम संस्कृतीचे
कुठवर करावेत पाढे पाठ
संयम अन् सहनशीलतेचे
भवितव्य गहाण ठेवून
कुणाकुणाच्या वाहाव्यात पालख्या
खांद्यांची सालपटं निघेपर्यंत.

पैशांची सोंगं आणताना
जेव्हा आतआतून येतात उमाळे
ते धगधगणारे अश्रू
बनतील नव्या क्रांतीचे दूत.

# हाडवैरी

दरेक सालाचं पंचांग
सांगत जातं भाकीत पावसाचं
अन् आम्ही पेरून येतो वावरात
जीव लावून ठिवलेलं बेणं
मोठ्या आशानं.

हातपाय खोडीत वर्षाआड
पोटापुरती बेगमी व्हती कशीबशी
धनधान्य वाढंल बरकत येईल
म्हणता म्हणता वाडवडील गेले
आमची पिढीबी गारद झाली.

पिढ्यापिढ्यांचा हाडवैरी हा पाऊस
येच्यापरीस बांध कोरणारा भाऊबंद परवडला
आशेला लावून ठेंगा तरी दावीत नई.

एकदाचं वाळवंट तरी व्हवून जाऊ दे
तिथं तरी एखादी हिरवळ
गवसंलच कनी!

⌘⌘

# कदाचित

पोळा भरलाय
ढोल बडवले जाताहेत
माणसं नाचताहेत बेहोशीत
बैल मिरवताहेत मुकाट
मुस्क्या बांधून पातीला जुंपल्यागत
पोळ्यात तशी जान नाहीच.

ऐपतीप्रमाणं सजलेत अन्
हिंगूळ गेरूच्या रंगांनी रंगलेत बैल
त्यांची हडकुळी पोटंही
रंगवली गेली आहेत
निवडणुकीतल्या बॅनरप्रमाणे
बैलांतही पडलेत पक्ष गट
मालकाच्या मर्जी व जातीनुसार.

गावाने शेकडो बैलांच्या
तालेवार मिरवणुकीचेही
पाहिलेत पोळे
एकोप्यानं काढलेले
दावणीच्या दावणी ओस पडल्यावर
आता नावापुरतेच उरलेले हे बैल...

आज मिरवतील पोळ्यात
उद्या कुठल्या कत्तलखान्यात
धाडले जातील... थंडपणे
कुणास ठाऊक.

पोळा आता बैलांचा कमी
अन् माणसांचाच अधिक
बैलांचा शृंगार करून
अनेकांनी मिरवायला काढलीय
आपापली श्रीमंती
मखमली झुलीखालून मात्र सारखी
उफाळून येतेय
खपाटल्या पोटातील लाचार भूक.

कुणी सांगावं
उद्याचा पोळा कदाचित
मातीच्या बैलांचाच असेल.

⌘⌘



ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# झुल्यावर

श्रावण सरींची
रिमझिमे गाज
ओली कुजबुज
झुल्यावर

बुजरे बावरे
धुमारे हिरवे
श्रावण शिरवे
झुल्यावर

माझ्या अंतरीचे
गीत उमलले
सूर थिरकले
झुल्यावर

⌘⌘

सण पंचमीचा
दूरदेशी प्राण
हेलकावे मन
झुल्यावर

कोकिळ स्वरांनी
सरावा दुरावा
आसमंत गावा
झुल्यावर

⌘⌘

# आठवांच्या पागोळ्या

ये गं ये गं सरी म्हणत
सरींना दूरच सारीत राहिले
डोळां दाटल्या सरींनाच
मडक्यामध्ये भरीत राहिले.

सर आली धावून तरी
मडके माझे वाहिले नाही
कसे कुणी घडवले सांगू
मडके, मडके राहिले नाही.

आता वादळ वाऱ्यात खुशाल
मडके माझे सोडून देते
सर आलीच धावून तर
ती मलाच वाहून नेते.

पावसाच्या सरी अशा
आयुष्यावर झडून गेल्या
आठवांच्या पागोळ्यांनी
नावा माझ्या बुडून गेल्या.

# मातीला पारखी होऊन

हा असा परक्यासारखा का वाटतोय गाव
पिढ्यान्‌पिढ्या गुण्यागोविंदानं नांदणारा
माणुसकीला जागणारा, इमानानं राबणारा,
हाकेसरशी धावणारा,
मातीत सोनं वेचणारा,
या कालच्या वावटळीत
कसा गेला भेलकांडून.

कसायाला गोठा विकून गब्बर झाल्यासारखी
ही सुजलेली श्रीमंती मिरवणारी माणसं
अशी का वाटताहेत भकास
आतून पोखरल्यासारखी
मातीला पारखी होऊन.

आजवर नाही आलं त्यांच्या घामाला मोल
ना झालं कष्टाचं चीज
त्यांच्या मालाला नव्हता भाव
कितीही पिकवलं कसदार तरी
उतरलेलं तोंड घेऊनच
बाजारातून घरी परतणारी ही माणसं
कालच्या अवकाळी धनवर्षावात
कोसळून गेलीत, करपून गेलीत आत-आतून
गारांनी झोडपल्यासारखी, वीज पडल्यासारखी.

तेव्हा असायची एक आशा की,
काहीतरी करील आपल्यासाठी
मायबाप सरकार!

पण या सेझच्या वादळात
जो तो करू पाहतोय
तुकडे, आपल्याच आईचे!

मायबाप शासनच मागतंय
सरकारी भावात जमीन
आणि भांडवलदारांच्या टोळ्या?
त्या तर टपूनच बसल्याहेत
शिवाराचे लचके तोडायला.

यावर कुठे-काही
घडलंच नाही; असं नाही
पण आमचं चिडणं इतकं वांझोटं की,
'गुतली गाय नि फटके खाय!'
तशी झोडपली गेली आमची माय.

आता सेझच्या या वादळात
कुठला पैसा नि कुठली आली भरपाई
कुणी सांगा हो, कुठे गेली आमची आई!

# बैलांस

दोन दिसांत पडंल पाऊस
तव्हर तग धरून रहा
कोरडी डाखळं चघळीत चघळीत
नव्या निळ्याची वाट पहा.

दोन बादल्यायची तहान तुमची
माला मह्यन्यापून आंघूळ नई
रोज टँकर येईलच येची
कशी देता येईल गाही?

हाडाची काडं झाली तरी
डोळे पाझरू देऊ नका
औंदा पडूंद्या चांगला मग
घालीन चंदी जोंधळं मका.

आभाळात रुसून बसला आसंल
बसू देत खुशाल बापडा
तुम्ही कोणावर रुसायचं सांगा
लाचार डोळ्यायनी लावायचा लकडा.


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# सायकल

कालबाह्य ठरणं वगैरे ठीक
पण काही गोष्टी ठरू लागल्याहेत
दारिद्र्याचं तथाकथित लक्षण
उदाहरणार्थ : सायकल.

फायद्यातोट्याचं असो
पण सायकलवर स्वार होऊन
नाही करता येत पार
लौकिकार्थाची दारिद्र्यरेषा.

सायकल हातात असताना
कुणालाही बांधता येतो चटकन
तुमच्या एकूण परिस्थितीचा अंदाज
अगदी खिशासकट.

ओळखीचे चेहरेही भररस्त्यात
चुकवतात नजरा अन्
कीव करणारे तर कितीतरी.

पद-पैसा-प्रतिष्ठा
सायकलची हकालपट्टीच करतात
आपल्या आयुष्यातून
अन् अट्टाहासाने वापरालच
तर मागास वा कंजूष लेकाचा
अशा संभावनाही अटळ.

सायकलवरून जाऊन
एखाद्या सरकारी कचेरीत
मुलांच्या शाळेत वा अन्यत्र
सन्मानाची वा चांगल्या वागणुकीची
अपेक्षा बाळगाल तर तेही व्यर्थच.

सायकलस्वारास तुच्छतेचा अर्थ
वेगळासा सांगावा लागत नाही.

म्हणून सायकल चालवणं टाळू म्हणाल तर
परिस्थितीच्या उन्हाचटक्यात
तिची साथ सोडता सोडवत नाही
तिचं धूळखात कोपऱ्यात पडून राहणं
मला कासावीस करत राहतं... अखंड.

माझ्या वडिलांइतकीच
त्यांची सायकल मला प्रिय
त्यांच्या मेटाकुटीच्या संसारात
दुधाची तहान भागवावी ताकावर
तशी त्यांनी सायकल घेतलेली
मोपेडची स्वप्नं बघताना...

जीवनाच्या अनेक वळणांवर
सायकलनेच पुरवली साथ
आख्ख्या घरादाराला.

आज वडील कृतकृत्यतेने
मोटरसायकलवरून फिरत असताना
मी मात्र सायकलसोबत
वडलांचं बोट धरून चालल्यासारखा.

# आसरा

कुत्री जी चालत होती बैलगाडीखाली
आख्खी गाडी ओढल्याचा आव आणून
आता दिसत नाहीत
कुठं झालीत परागंदा
बैलगाडीच्या मालकासोबत...
वा लागलीत देशोधडीला.

अधूनमधून दिसतात ती
ऊसतोडीच्या तांड्यांसोबत
पूर्वीचा आब हरवून बसलेली...
केविलवाणी.

हीच कुत्री दिसतात कधीकधी
आपल्या मालकांसोबत
पोटाच्या ओढीने
शहराकडे आलेली
शहराला नकोशा कोपऱ्यात
जीव जगवणारी.

गावाकडे घरधन्याच्या थाटात
आपल्या घरादाराचं-शेतमळ्याचं
गुराढोरांचं राखण करणारी ही कुत्री
इथं मिळंल ते खाऊन
ढकलताहेत दिवस.

पूर्वीचा मालकही इथे
दाखवित नाही आपुलकी वा ओळख
अंगावर हात फिरवून वगैरे
खरंतर त्यालाच त्याच्या भाकरीचा प्रश्न.

अल्सेसियशनसारखी अनेक शहरी कुत्री
सकाळ-संध्याकाळी
शहरातल्या उच्चभ्रू रस्त्यांवर
वावरतात मालकाच्या बरोबरीने
स्वच्छ चकचकीत लाडावलेली.
त्यांचा कितीही हेवा वाटला तरी... असो
अन् गाव सुटल्याच्या आठवणी
राहतात छळत.

दारोदार होणारी हाडहाड
आणखी मायेची सावली गमावलेली
ही कुत्री शहरात होत नाहीत शहरी
अन् जातात रापत.

परवा उन्हात व्यायलेल्या कुत्रीची
चार पिलं मेली करपून
आसऱ्याविना.

शहराच्या मोहानं तोडू नयेत
गावाचे जिव्हाळे हेच खरं.

⌘⌘

# देवराया आता

देवराया आता
बदलला काळ
तुझेही गोपाळ
नाही मागे

दावणीला त्यांनी
बांधुनी ट्रॅक्टर
बैलांसी बाजार
दावियेला

पाडुनिया गोठा
बांधिले गॅरेज
उभी तेथ आज
युटिलीटी

पिशवी दुधाची
दाराशी सकाळी
कपिला ती काळी
कशापायी?

देऊळ तुझेही
बदलुया थोडे
दामटुनी घोडे
विश्वस्तांचे

धर्मशाळा मोठी
बांधू टोलेजंग
करू भले चांग
दांभिकांचे

⌘⌘

# पाणकळा

पाणकळा आता पह्यल्यावानी
नेमाजोमानं व्हत नई
पिढ्यापिढ्यांचं जपलेलं बेणं
तापल्या मातीत रुजत नई.

चार बैलायची दावन पह्यली
मह्यना मह्यना राबत व्हती
टॅक्टरच्या चार चकरात आता
भूईचा वाफसा व्हत नई.

येहरी मोटात पह्यलं पाणीच पाणी
आख्खा ईळ हालत नव्हतं
मोटरीचे सांगळे काढून आता
धरतीची कूस उजवत नई.

आखाडी मंगळवारी समद्या शिवारात मोढा
ढोरामाणसायला तेवढाच इसावा
आता पाणकळाच पळाला तव्हा
रोजचाच मोढा अन् जल्माचा इसावा.


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# जगण्याची ओढ

सुगीचे दिवस सरलेले
आणि पंखांनाही उडण्याचा
विसर पडलेला
बऱ्यापैकी.

अंधारलेल्या वाटा
काजव्यांनीही चमकायला कचरावं
उतरून गेलेला
प्रत्येक उतार चढण बनून
आव्हान देत
समोर उभा ठाकलेला.

शब्द रुसलेले
अर्थ केविलवाणे
कवितेची धडपड
अन् कोराच कागद
असह्य वेणा.

जगण्याची ओढ
मरणाला हुलकावणी देत
शोधतेय आशेचा किरण
अंधारवाटेवर.

पण अंधारवाटेचं काय...?

⌘⌘

# ऋतू दुष्काळाचा

ऋतू दुष्काळाचा
गावावर आला
बरसून गेला
डोळीयांत

ज्याच्या त्याच्या पोटा
भूकेचा सोहळा
अन्न तोळा तोळा
महागले

गावगाडा कसा
दुष्काळी रुतला
काळही हासला
स्मशानात

थयथया भूक
पोटात नाचली
डोळ्यांत साचली
मरणाई

ढोरा माणसांची
पोटं हरवली
भूक मिरवली
गिधाडांनी

⌘⌘

# आसवे

तळपते ऊन
धराही तापली
कुठेशी नादली
घंटा क्षीण

सूर खिन्नतेचा
घुमला बाहेर
उदास लकेर
वाऱ्यावर

पाऊस पारखा
धरती कोपली
धिंड का काढली
दूरदेशी

ओसाडला गाव
छप्परे फाटली
आसवे गळाली
मातीमोल

ओसाड गावाचा
उद्‌ध्वस्त राव तो
तुज धिक्कारितो
देवराया

मज ठावे तुज
भूक ना तहान
का रे खाली मान
घालतोशी

# चिऊताईचं घरटं

चिऊताई, खरंच किती दुरापास्त होत चाल्लंय नाही
हल्ली घरटी बांधणं
चार काड्या जमवून
पूर्वी बांधता यायचं घरटं
साजेसा निवारा पाहून
कुठंही कधीही
अगदी कुणाच्या घरात, ओसरीत
व्हरांड्यातही... बिनदिक्कत
नाहीच तर अडगळीत, पडक्या वाड्यात
शाळांच्या इमारतीत... सर्वत्र
भरून जायचं अंगण चिवचिवाटानं.

हल्ली पैशाच्या महापुरात
वाढत चाललीत सिमेंटची जंगलं
आणि तिच राहताहेत धरून तग
वाहून गेलंय चिमणीचंच घरटं
या विचित्र त्सुनामीत
'...तेथे लव्हाळे वाचती'
असं म्हणण्यातही नाही उरला अर्थ आता.


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

चिऊताई,
वाताहात झालीय माणुसकीची
आता मोबाईलच्या रिंगटोनवर
ऐकू शकतो आम्ही चिवचिवाट
स्वागताला इन्कमिंग कॉलच्या
तेव्हा तुझी किलबिल
हवीय कुणाला.

या उंचच्या उंच इमारती
ही चकचकीत घरं
या सिमेंटच्या वस्तीत
तुझ्या-माझ्या सारख्यांचा
घरट्याचा हट्ट चुकीचाच
असंच वाटत राहतं!

⌘⌘


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# झुळूक (?)

तेव्हा तुम्ही किरकोळ घटना म्हणालात
अतिरेकी हल्ल्यांना
मुंबई जेव्हा रक्ताने निथळत
श्वास रोखून बसली होती
असाहय्यपणे २६/११ रोजी.

आमच्या ताटातल्या भाकरी पळवणारी
आर्थिक मंदी आली परवा त्सुनामीसारखी
तर हे म्हणताहेत...
मंदीची 'झुळूक'
वाऽरे झुळूक!

'आजपासून तुम्ही येऊ नका कामावर!'
म्हणून जेव्हा पहिल्या शिफ्टला
डबा घेऊन गेलेल्या
कंत्राटी कामगाराला सांगितलं जातं
तेव्हा त्याची जड पावलं
कुठल्या तुफानात हरवतात
... म्हणे झुळूक!

# सीमोल्लंघन

परंपरा जपावी म्हणून
प्रत्येक विजयादशमीला
हटकूनच ओलांडली शीव
अन् लुटलं सोनं... मोठ्या उत्साहानं.

आता पोटापाण्यासाठी
कितीतरी गावांच्या सीमा पार केल्यानंतर
आयुष्याचं करू म्हणतोय सोनं
मायमातीला पारखा होऊन.

# कोडे

अनंताने आम्हा
ऐसेची ठेविले
चित्ती ना दिधले
समाधान

काव्य करू जाता
कल्पनेची बाधा
यमकाची त्रेधा
गांजविते

वनांतरी जरी
ठरविले जावे
स्वार्थाचीच गावे
खुणाविती

प्रपंचाचे कोडे
कोणा उलगडे
सुख जवापाडे
भूलविते

षड्रिपू आम्हा
बहू नागविती
आम्ही भार संती
टाकिलेला

ऐसेचि गा आम्ही
मावेचे मईंद
पैसाचि गोविंद
आम्हालागी

⌘⌘

# सांज

निळ्या नभी
सांज उभी
कुणासाठी
रेंगाळते

खुळी कळी
अशा वेळी
वेलीवरी
मुरडते

वारा बंद
दिशा धुंद
लाली मंद
तरळते

प्रीत माझी
सांजेपरी
मनी तुझ्या
थबकते

गीत माझे
तुझ्या ओठी
थरकत
उमलते

कातरते
सांजपरी
प्रीत मम
मोहरते

सख्या माझे
जगणेही
तवपदी
विसावते

⌘⌘


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# आसवांचा पाऊस

ओसाड रानातला शेवटचा मोर तो
वेड्या बाभळीच्या काटवनात
अजून तग धरून आहे
... आज तरी पडेल पाऊस.

कितीतरी दिवसात त्याने
फुलवलाही नाही
आपला पिसारा
थुईथुई नाचणंही
आताशा तो
विसरत चाललाय.

सगेसोबती केव्हाच झालेत परागंदा
दुष्काळाच्या मरणलाटेत
कुठवर पहावं
कोरडं आभाळ
कोरड्या डोळ्यांनी
कसं आणावं पंखात बळ
फुलण्याचं...
जगण्याचं.

आसवांच्या पावसात
चिंब भिजून
आता तो तयारीत आहे
पिसाऱ्यातले शेकडो डोळे
आभाळावर रोखून
जिवाच्या आकांताने
थुईथुई नाचण्याच्या.

हा असेल
त्याच्या कोरड्या डोळ्यांचा
कोरड्या आभाळाला
अखेरचा सलाम.

⌘⌘


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# जीवनअर्घ्य

श्रावणातील सुप्रभाती
दवगंगेत स्नान करून
असंख्य तृणपात्यांनी
उगवत्या सूर्यास
हात उंचावून
दवबिंदूंचे अर्घ्य देत
रानफुले अर्पित
प्रार्थना केली
'दुरितांचे तिमीर जावो...'

आजही प्रभातच...
वैशाखाची
करपलेले हात
उंचावतही नाहीत
उमटत नाही
एकही शब्द
शुष्क ओठांतून.

तरीही
प्राण कंठाशी आणून
आपल्या पित्याला
जीवनअर्घ्य देण्यासाठी
काहीसे उंचावले
खुरटे हात
त्याचवेळी
सुकलेले ओठही थरथरले
‘दुरितांचे तिमीर जावो...’

आज पुन्हा एकदा सूर्य कळवळला
अगदी कर्णाच्या बलिदानाने
कळवळला होता तसा.

⌘⌘

# मन

किती वळवावे
मन वेळोवेळा
सुखशांती डोळा
शोधितसे

पाहे जरी सोडू
स्मृतींचा पिंजरा
रम्य तो साजरा
भूतकाळ

स्वप्नरंजनाची
मना लागे गोडी
वेध हरघडी
भविष्याचा

किती शिकवावे
मना वेळोवेळा
आजचा सोहळा
उद्या नाही

# जुगार

दोघे भाऊ
एकाच भावहिश्यातल्या
काळ्याभोर चार एकराचे मालक...
एकाने घाम गाळून
मातीत पेरावेत कष्ट
गुरंढोरं घरादारासकट...

दुसरा रुजवतोय स्वप्नांची शेती
मटक्याच्या पेढीत
जुगारअड्ड्यावर.
गुरंढोरं फुकून
घरादाराची राखरांगोळी करीत...


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

पहिला आपला सरळसाधा
वर्तमानपत्रातले बाजारभाव
राशीभविष्य चाळीत
हिरव्या रानावरून ओवाळून टाकतो जीव...
मातीत जेव्हा रुजून येतात पेरलेले श्रम
अन् लागतात मोत्यांची कणसं
तेव्हा गर्भार बाईवानी
उजळून निघतो तो.
कांदा, टमाटा, द्राक्षं, कोबी, कापूस
कधी मेथी, कोथिंबीर
अशी गोंडस बाळं त्याच्या दारात
हंगामागणिक.
मार्केटयार्डात मातीमोलानं
विल्हेवाट लावताना
त्याचा गर्भपातही ठरलेला.

कल्याण वरळीसारख्या शुभराशींचे
पाठबळ घेऊन
दुसरा आपला लढतो आहे
आकडेवारीच्या मृगजळावर
स्वप्नं पेरीत फिरतो आहे
नवनवी दालनं उघडतायेत त्याच्यासाठी
अगदी.. खेलो इंडिया खेलोसारखी.
एकंदरीत दोघेही हरतच आहेत
क्रमाक्रमानं.

कुणी बनला आहे
कुणी बनवला गेलाय
जुगारी.
पहिला आता मोठ्या उमेदीनं
उतरलाय मैदानात
अन् गाडून घेतोय मातीत स्वत:ला
हरण्यासाठी
सृजनाच्या जुगारात
पुन:पुन्हा.

⌘⌘


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# कसे?

गवतफुलांनी सांगा
हसावे कसे?
मनमुक्त नभाखाली
फुलावे कसे?

मकरंद शोधताना
परतून भृंग गेले
हे शल्य वंचनेचे
सहावे कसे?

हा शाप शुष्कतेचा
जन्मासवे मिळाला
रस रूप गंध आम्हा
मिळावे कसे?

फुलपाखरे खुळी ही
आलीत सोबतीला
सुख स्पर्शता सुखाला
झुरावे कसे?

ही पायवाट इथुनी
तुडवित प्राण गेली
त्या मत्त पावलांना
नमावे कसे?

ओसाड माळरानी
नसतील फुलबागा
फुलवू तरीही माती
हरावे कसे?


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# वाट

हे रस्त्या
तुला वाट व्हायचंय
थांब थोडंसं
हे डांबरी पांघरुण
मैलांचे दगड
सारं उतरवून ठेव
अगदी शहरी ताण
टनांची ओझी
जीवघेणा धूर.

माझ्याबरोबर चल
अंगभर फुफाटा
खडीचे तुकडे
थोडे खाचखळगे
असतील...

गायगुरांची खुरं
बैलगाडीच्या धावा
अनवाणी, कणखर, भेगाळलेली पावलं
कधी धसमुसळ्या रापलेल्या वहाणा
तुझी सोबत सोडणार नाहीत
हे खास.

वेड्या बाभळी
तुझ्या अस्तित्वावर
गदाही आणतील
एवढ्याने नकोस घाबरू
रिमझिम पाऊस
टळटळीत ऊन
गारठवणारं धुकं
आणतील तुझ्यासाठी
जीवन वाहून.


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

कधी एखादी
हळवी नजर
भिरभिरेल तुजभवती
लांब क्षितिजापर्यंत...
तिची आर्तता
तुला कळेल ना?

अपघात
रक्ताचे अभिषेक
इथे कदाचित
मिळणारही नाहीत
पण रक्ताचं पाणी करून
तुझ्यावर शिंपणारे जीव मात्र
पावलोपावली.

आणखी एक
इथंच वाट होऊन
वाट पाहत रहा
तुलाही कळेल
'वाट लागणे'
या शब्दाचा अर्थ.

⌘⌘


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# पोटशूळ

चूल अन् मूल सांभाळता सांभाळता
ओसरीवरही टाकलंस तू दमदार पाऊल
आजवर पाळण्याची दोरीच होती
केवळ तुझ्या हाती
तेहतीस टक्क्यांच्या आरक्षणानंतर
जेव्हा तू जग उद्धारायला निघालीस
तेव्हा उखडली गेली कैक पिढ्यांची चौकट
सत्तेच्या मापटासकट
अन् गावोगावचे कुटाळ पारही
चरफडले मनातून.

एरवी गाववेशीतून चढतानाच
पायीची वहाण हाती घेत
पदराच्या आडोशाला लपवीत
खालमानेनं घर गाठणारी तू
अन् तुझ्या प्रत्येक हालचालीबाबत जागरुक
... कुटाळ पार
तुझी खुर्ची उठवित असते त्याचा पोटशूळ.



साहित्य प्रतिष्ठान
www.esahity.com

आता मात्र तू व्हावंस सावध
युगानुयुगांच्या दास्यत्वाची
जोखडंही दे भिरकावून शिताफीनं
अन्यथा
स्त्रीजातीची थोरवी गात
तुझ्या नामधारीकरणाची
शक्यताच अधिक.

# सरी

सरी सरी
आता तरी
धावू नको
घडा भरी.

भरी भरी
झडकरी
घडा माझा
रिता शिरी.

शिरी शिरी
फुटे घडा
आसवांचा
पायी सडा.

# खरीप टळून गेल्यावर

खरीप टळून गेल्यावर
पाऊस खूप आला
पाण्यावाचून मरता मरता
पूर वाहून गेला.

चार महिने चार शितोडे
पीक येईल कसं
पूरपाणी आला तरी
मन येडं पिसं.

पाणी पाऊस नई म्हणून
वरडता येईल का
पीकपेऱ्याचं गणित असलं
सोडवता येईल का?

दुष्काळ तर पाचवीलाच
पूरही येतो कधीकधी
वळ्ळं वाळलं जीणं आमचं
धुवून नेतो कधीमधी.

# दिस रात

दिस उघडा नागडा
आला माझ्या गं दाराशी
कडेखांदी घेऊ कशी
रात बसली उराशी.

रात झाली अंगभर
रात निजली निजली
दिवसाच्या उजेडाला
माझ्या मनात लपली.

आता दिवसा उजेडी
रात पांघरुण घेते
दिस हुंदडत येतो
रात नित हंबरते.

दिस येईल येईल
रात मनात झुरते
काळ्या झोपडीची दशा
माझ्या शरीरा घेरते.

रुळे रात खांद्यावरी
मनी दिस उगवतो
अंतरल्या आशा तरी
दिस मनाला भावतो.

येवो दिस; रात येवो
काया बहिरून जाते
रातदिसांच्या खेळात
माझी मीच हरवते.

रात बरी सखी माझी
तिला नको गं आरास
कुडाच्या या झोपडीला
कसा साजंल गं दिस.


ई साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# तू आणि मी

गळा तुझ्या रुळे
मोतियांची माळा
आणि माझ्या भाळा
राख कैसी?

नीर आनंदाचे
डोळां तव दाटे
मम ऊर फाटे
वंचनेने.

शय्येवरी तुझ्या
शीतल चांदणे
चांदण्या मोजणे
आम्हालागी.

⌘⌘

# संक्रांत

आता कसले पेड हॉलीडे मागताहात
आयुष्यातले सगळे उत्सव
हद्दपार करीत
संक्रांत येऊ घातली आहे
कायमची.

यंदा ती कामगारांवर बसली आहे
तिच्या हातात आहेत
मधाळ अस्त्र
सीआरएस अन् व्हीआरएसची
पुतनामावशीच्या दुधासारखी.

तिला बंधन नाही दिशांचे यंदा
दिगंत व्यापीत चाललीये ती
यंत्रांची चाकं चिरडीत
पेटलेल्या चुली विझवीत.

तुम्हीच सांगा
कडवटलेल्या तोंडानं कसं म्हणणार तिला
तीळगूळ घे अन् गोड बोल
कसा करणार साजरा
काटलेल्या पतंगांचा उत्सव
काळवंडलेल्या आभाळात...

⌘⌘

# मरणकळा

उघडं तळं
बोडकं ऊन
सरला प्राण
गिधाड धन.

तापल्या खुरा
करपे तन
मेलं मन
रानोमाळ.

शेवाळ डोळे
दुबळी कुडी
जगबुडी
मृगजळात.

हाडांची काडं
उन्हाच्या झळा
मरणकळा
जागोजाग.

# अनावर

काजळते मन कातरवेळी
सांजसावल्या पिंपळपारी.

दूर पलीकडे दिसू लागले
दीप आशांचे विझू लागले.

तुझ्या मंदिरी येऊ कशी मी
शिणते थकते व्याकुळते मी.

आता विसावा तुझ्याच गावा
तुझेच चिंतन तुझाच धावा.

ऐल तटावर अश्रूंचे घर
वेगे अवतर जीव अनावर.

⌘⌘

# वेडी बाभूळ

वेडी बाभूळ एकटी
तिच्या मनात काय ते
राघू मैनेचे गुपित
दुःख हासऱ्या फुलांचे

अशी बांधाशी उभी का
राघू मैनेला कळे का?
फांद्यावरी तिच्या रुळे
काट्याकाट्यातून खेळे.

दंगा पाखरांनी केला
साज पिवळ्या फुलांचा
अंग वेडावून कशी
तिच्या एकटेपणाचे

अंगी काटा मोहरला
पानापानात बुजला.
पानोपानी ती नाचते
पाखरांशी जडे नाते.

सांज सरता एकटे
अंग भरले काट्यांनी
फुलण्याचे वेड परी
मन आभाळी गुंतले

असे कितीक रडावे
वर फुलांनी फुलावे.
बाभळीने जपलेले
मूळ बांधात रुतले.

⌘⌘



साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# वखवखलेलं रान

डोईवरला सूर्य
खिन्नपणे बघतोय
मातेची ममता... हताश.

बिचारी पोटार्थी
पदराआडल्या पोराला
दूर सारून
सताड पसरल्या हावरट रानाला
निंदते; खुरपते.
अशी रोजची निगरानी
पोटच्या पोरापरीस.

कितींदा भूकेपायी
व्याकूळ बाळ
सुकलेले ओठ
दुधासाठी.
वखवखलेलं
अवघं रान
तिला कवेत घेण्यासाठी.

बाळाच्या टाहोनं
गळून पडली सगळी बंधनं
पोटाची दहशतीची रोखलेल्या डोळ्यांची.

तिनं केलं छोटंसं बंड
मोठ्या धाडसानं
बाळाला पदराआड घेण्याचं
लुचणाऱ्या बाळाला भिरकावीत
रानानं तिला लुटलं
वात्सल्याचं बंड
वासनेनं मिटलं.

आसमंतभर किंकाळ्या
रान अजूनही अतृप्तच
नव्यानव्यानं निंदणी-खुरपणीसाठी.

# बिटको पॉईंट

सकाळी सकाळी उगवत्या सूर्याला
जेवणाच्या डब्यात भरून
ते विकायला निघतात दिवस
भाकरीच्या बदल्यात
असे कैक सूर्य विकून टाकलेत त्यांनी
पोटातला जाळ विझवताना.

शहराला येत असते जेव्हा जाग
उघडू लागतात दुकानं किलकिली होऊन
तेव्हा भरलेला असतो त्यांचा बाजार
बिटको पॉईंटवर...
'बिगाऱ्यांचा बाजार.'

मिळतात सगळ्याच कामासाठी
मजूर रोजंदारीवर
एका दिवसाचा रोज मोजून
वाजवून घ्यायचं काम
शेतमजुरी, बांधकाम, साफसफाई,
नालेसफाई, कसलंही असू द्या
रोजचं काम, रोजचा पैसा
एका दिवसाची बांधिलकी.

या बिगाऱ्यांची नसते विम्याची कटकट,
ना पीएफ ना कुठल्या सुविधा
रोज नवं काम नवा मजूर
'मजूर' शब्दही त्यांच्यासाठी बराच आदरार्थी
कामगार शब्दाच्या ऐटीच्या
पोहचू शकत नाहीत ते जवळपासही
कसा असेल त्यांना आरोग्य विमा किंवा
कसं असणार त्यांच्यासाठी कल्याण मंडळ
आठवडे बाजारी बाजारहाट करून
ते बुडवून टाकतात सूर्य
दारूच्या बाटलीत.

दुपारी शहरात उसळलेल्या दंगलीनंतर...
मुलं शाळेत गेली असतील का?
म्हाताऱ्या आईनं औषध घेतलं असेल का?
घरी जाईपर्यंत झोपडी जागेवर राहील का?
असले प्रश्नही सतावत नाहीत त्यांना
कामाच्या रगाड्यात.

फक्त असेल एकच अपेक्षा
जास्त वेळ ताटकळत बसण्यापेक्षा
रोज मिळावं काम
चूल पेटण्यापुरतं
पोट जाळण्यापुरतं...

⌘⌘

# खाणाऱ्यांची मज्जा!

चला चॉकलेटच्या भावात लावला
रुपयाला एक गड्डा म्हणत
भर बाजारात
स्वत:चीच हेटाळणी करीत
मरत असतो तो
सगळ्यांच्या डोळ्यांदेखत.

शेतकरी केवळ फाशी घेऊन, विष पिऊन
वा स्वत:ला पेटवून घेऊन
आत्महत्या करतो असं नाही.
कैकदा बाजारात
पोटच्या लेकरावाणी
पिकवलेल्या भाजीपाल्याची,
अन्नधान्याची अशी मातीमोलानं
विक्री करताना
तो आत्महत्याच करीत असतो
खऱ्या अर्थानं.



साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

एक रुपयाच्या भावानं
पिकपभर मालाचे
शंभर रुपयेही होणं मुश्कील.
अहो सगळा खर्च तर सोडाच
पण गाडीभाडंही निघणं कठीण
तिथं हा अन्नदाता
आपल्या मालाची तुलना
चॉकलेटशी करीत
गिळत जातो जहरी कडू घोट
अन् भर उन्हातान्हात
करपत असतो आत आतून
तरीही म्हणतच असतो...

'चला चॉकलेटच्या भावात लावली
कोबीचा एक गड्डा अन् रुपयाला फूलवर
खाणाऱ्यांची मज्जा!'

⌘⌘

# मायची माती

दिसभर बाजारात
बसून उन्हातान्हात
पोतंभर जुड्या
मातीमोलानं विकणारी ती
बाजारपट्टी अन्
गाडीभाडं तरी निघंल का?
म्हणून हताश अन्
'ये मावशे पाचला तीन देती का?'
म्हणत तिचे धिंडवडे काढणारी,
केवळ छापील किमतीचाच आब राखणारी
तिची शहरी पोरं आम्ही
खरंच असे किती पैसे वाचवतो
मायची माती माती करून?


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com

# न्यारी

तुझी भांडण्याची तऱ्हा बाई न्यारी
आणि मिटविण्याची कला बाई न्यारी.

मलाही कळेना कुठे चूक झाली
रुसण्याची फुगण्याची अदा बाई न्यारी.

फुलांनीच जर का असे बंड केले
बहरून गळण्याची सजा बाई न्यारी.

किती या सरींची आर्जवे मी करावी
चातकाच्या तृषेची व्यथा बाई न्यारी.

जरी रात वेडी अबोल्यात गेली
मिलनाच्या भाषेची कथा बाई न्यारी.

⌘⌘

# शब्दफुलांच्या वाटेवरती

शब्दफुलांच्या वाटेवरती
कविकल्पना जेथ विलसती
सृजनाच्या त्या गावामधले
ते तुझे रे घर कवितेचे.

घनधारांनी धरा भिजावी
मयुराच्या नर्तने सजावी
मृद्‌गंध ठिबकतो शब्दांतुनी
ते तुझे रे घर कवितेचे.

चिद्‌घन चपला प्रतिभेपाठी
सुखस्वप्नांची लोभस दाटी
कीर्तीची पैंजणे थिरकती
ते तुझे रे घर कवितेचे.

# नव्या उभारीसाठी

तो अन् मी संगतीचेच... शाळासोबती
जीवनकलहात तो झाला शेतकरी
अन् मी कामगार
भेटलो म्हंजे बोलत असतो मी
पगारवाढ बढती बोनस या विषयांवर..
पोकळ फुशारकीनं.

माझ्या प्रत्येक भेटीत तो मात्र
करीत जातो चौकशी
युनियनच्या कारवाया, संप, व्हीआरएस
अन् बंद पडणाऱ्या कंपन्यांविषयी...
बोलता बोलताच थरकाप उडवीत जाते
माझ्या अस्थिर भवितव्याची जाणीव
मी खिन्न होतो.

मग निमूट अपराधीपणानं
त्याच्या विहीर, सायपनची
तसेच ऊस, कांदा व द्राक्षबागेची
कोडकौतुकं  करीत राहतो.
मातीत रमणारा तो
बढाईत काही रमत नाही
माझ्यासारखंच त्यालाही बेजार केलंय
जागतिकिकरणाच्या रेट्यानं.

कधी हवामान तर कधी बाजारभाव
अन् पाचवीला पूजलेला दुष्काळ
चुकवीत जातो त्याचे अंदाज
वर्षागणिक.

तो मात्र
काळ्या आईवर जान कुर्बान करीत
लावीत असतो पणाला.. सर्वस्वाला
द्युतात हरणारा धर्मराज होऊन.
आम्ही दोघेही राष्ट्राचे आधारस्तंभ
मनातून कोलमडलेले
धडपडतोय पुन:पुन्हा
नव्या उभारीसाठी.

# आठवणींची भरता शाळा

आठवणींची भरता शाळा
वर्ग रिकामा मनास छळतो
रूप लेवूनी सावित्रीचे
बाईंचा चेहरा तरळतो.

खडूफळ्याची सोबत आणिक
दप्तर विटके, फुटकी पाटी
बालपणीचे सरले वैभव
सोनसयींची मनात दाटी.

पायही होते अनवाणी अन्
गणवेषाची कुठे झळाळी
परी ज्ञानाची खरी खुमारी
वास्तुतुनी या आम्हा कळाली.

बालभारती पुस्तक केवळ
पुस्तक नव्हते अमुच्यासाठी
शब्दफुलांची नक्षी रेखीत
मनात रुजली मायमराठी.

नव्हती जरी गणिताशी गट्टी
छडीने पाढे पाठ करवले
वीण मैत्रीची घट्ट जोडुनी
सवंगडी परी दूर हरवले.


शेणाने सारवल्या भूईवर
अंथरण्या जरी नव्हते बस्कर
शिवबापरी त्या सांगत गोष्टी
जोजविले तुम्ही अमुचे अंतर.

नव्हती जरी का भव्य इमारत
तिने घडविला अमुचा पाया
अशी शिदोरी संस्काराची
खरेच का कधी जाईल वाया.

वाट्या काठ्या बाराखडीतून
गेलो अक्षर अक्षर गिरवत
मैत्र जीवाचे होऊन अवघी
हिच अक्षरे आली सोबत.

जपला, जपतो मनी निरंतर
शाळेचा हा लळा जिव्हाळा
हुरहुर परी दाटते अंतरी
आठवणींची भरता शाळा.


साहित्य प्रतिष्ठान www.esahity.com



कवी ज्या वातावरणात लहानचा मोठा झालेला आहे, त्याचा म्हणून एक प्रभाव कवीवर आहे. तो त्याच्या कवितेतून जमेल तसा अभिव्यक्त होताना दिसतो.

किरण भावसार यांचं वडांगळी हे गाव, महाराष्ट्रातील अनेकविध खेड्यांसारखंच! धड शहरही झालेलं नाही अन् खेडंही उरलं नाही. तेच समाजजीवनाच्या बाबतीत. कृषीसंस्कृती आणि औद्योगिक कारखान्यांच्या पार्श्वभूमीवर आपलं स्वत्व जपत लढत आहे. त्यात व्यवस्थेचे कंगोरे आहेत. निसर्गाचे कलात्मक रंग आहेत. परिस्थितीशी झगडणारा माणूस आहे. तो झाडरूप आहे. त्याला फुलायचं आहे. भक्कमपणे उभं राहायचं आहे. मुळांवरची माती सांभाळत जगण्याला सामोरं जायचं आहे. या अर्थाच्या या कविता अस्सल मगदूराच्या आहेत.

माणसाच्या माणूसपणावर श्रद्धा असलेली ही एक निखळ कविता आहे. जगण्याचं आणि लढण्याचं आत्मीय बळ यातून मिळू शकेल इतक्या चिंतनशील आणि हृदयस्पर्शी कविता किरण भावसार यांनी लिहिलेल्या आहेत.

**कादवा शिवार प्रकाशन, नाशिक**
kadvashivar@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

## बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना अडिचशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. मोरया, मीरा, कृष्णा, गुरुदेव रविंद्रनाथ, स्वा. विवेकानंद, विंदा करंदिकर, ना धों महानोर, ग्रेस , नारायण सुर्वे, लोकमान्य टिळक, छत्रपती शिवाजी महाराज, शंभूराजे असे एकाहून एक सरस विषय आम्ही घेतले. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. प्रेम आणि सौंदर्याबरोबरच विद्यार्थी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या, दहशतवाद अशा ज्वलंत विषयांवरचं साहित्य मांडलं. विनोदाला वाहिलेलं ई श्टाप देऊन हसवलं. लहान मुलांसाठी बालनेटाक्षरीची निर्मिती केली. शास्त्रीय संगीताची समज तरुणांत येण्यासाठी संगीत कानसेनचे ई वर्ग चालवले. नव्या कवींसाठी एक भक्कम व्यासपीठ म्हणजे नेटाक्षरी चालवले. तर महाराष्ट्रातल्या किल्ल्यांची माहिती देणाऱ्या पुस्तिकांची मालिका “दुर्ग दुर्गट भारी” द्वारे महाराष्ट्रातल्याच नव्हे तर जगभरातल्या मराठी मंडळींना मराठमोळ्या इतिहासाची उभारी दिली. “जिथे जिथे मराठी माणूस, तिथे तिथे ज्ञानेश्वरी” ही चळवळ आपण पहात आहातच. केवळ कविताच नव्हे तर कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तकेही आपल्याला इथे मिळतील.

सव्वा लाखभर रसिकांपर्यंत दर्जेदार साहित्य नियमितपणे विनामूल्य पोचवण्याची आमची परंपरा आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाखभर लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आणि त्यासाठी काही फ़ार करायची गरज नाही बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. एक लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य पाठीराखे म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

**तर होणार ना ई साहित्यचे पाठीराखे ?**आपल्या खास मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा. खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल

- अधिक माहितीसाठी –

**: संकेत स्थळ :**

**www.esahity.com**